**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.38, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, SEPT-OCT, 2019, VOL- 7/53*

# औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील पालक-शिक्षक, विद्यार्थ्यांच्या आंतरक्रियाचा अभ्यास

**एस. एस. पाठक[१], Ph. D. & तायडे दंडपाल भिमराव[२]**

*[१]सहाय्यक प्राध्यापक, पदव्युत्तर शिक्षणशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद*

*ईमेल- sspathak2010@gmail.com*

*[२]संशोधक, संशोधक विद्यार्थी. ईमेल- dandpaltayde03@gmail.com*

**Abstract**

*भारताचे भविष्य शाळाच्या वर्ग-खोल्यातून घडत आहे. असे मत कोठारी आयोगाने नोंदविले आहे. ही सर्वस्वी जबाबदारी शिक्षकांची व शाळेची आहे. शाळेतून मुलांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे मुलांच्या अंगी असणा-या सर्व क्षमता गुण प्रभुत्व पातळीपर्यंत विकसित झाले पाहिजेत. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, भावनिक, शारीरिक व सामाजिक म्हणजेच सर्वांगिण विकास झाला तरच प्रत्येक शाळेतून भारताचे भावी आदर्श व सौजन्यपूर्ण नागरिक तयार होतील यात शंका नाही.*

*आपन गेल्या अनेक वर्षापासून उच्च प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी प्रयत्नशील आहोत. त्यात मोठ्या प्रमाणावर आपण यशही मिळवले आहे. आता आपल्याला आवश्यकता आहे ती गुणवत्तेच्या सार्वत्रिकीकरणाची त्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. अशा प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रयत्न करीत आहोत.*

*वर्गातील एकही विद्यार्थी अप्रगत किंवा ताण विरहीत राहणार यासाठी आपण वर्गात व शाळेत तसेच घरी अनेक विविध प्रयोग राबवित असतो. अशा अनेक विविध प्रयोगापैकी सगळयात परिणाम कारक प्रयोग म्हणजे पालक-शिक्षक आणि विद्यार्थी आतंरक्रियातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीत कशा प्रकारे वाढ होईल याचा विचार करण्यात आला आहे.*

*या प्रयोगाची प्रेरणा वर्गातील अप्रंगत मुलांकडून मिळालेली आहे. आमच्या शाळेत इ. ६ वी मध्ये शिकणारा एक विद्यार्थी असा होता कि त्याला आपण कितीही समजावून सांगितले तरी त्याला ते सुक्ष्म निरीक्षण केले तेव्हा असे लक्षात आले कि त्याला वर्गातील इतर मुलांनी किंवा त्यांच्या मित्राने आणि आई-वडीलांनी समजावून सांगितले तर त्याला ते समजत होते ही गोष्ट शिक्षकांच्या लक्षात दैनंदिन निरिक्षणातून व मुलांशी केलेल्या चर्चेतुन लक्षात आली. याच घटनेतून प्रेरणा व मार्गदर्शन होऊन संशोधकांने शाळेतील विद्यार्थी आणि पालक शिक्षक यांच्या आंतरक्रियाचा विवचार करून हा प्रयोग राबविण्याचा मानस संशोधकांनी केला आहे.*

Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com

**प्रस्तावनाः**

विद्यार्थी, शिक्षक आणि पालक हे तिन घटक म्हणजे समभुज त्रिकोण आहेत. सर्वाची जबाबदारी सारखीच आहे. विद्यार्थ्याचे व्यक्तीमत्व विकसित करणे. गुणवत्ता प्राप्त करणे अभ्यासात उत्तुंग यश संपादण करणे. बौद्धीक साररिक मानसिक भावनिक विकास होणे यासाठी शिक्षण व पालक यांच्यात समन्वय असणे अतिशय महत्त्वाचे आहे. त्याच बरोबर ऐकमेकांसोबत आंतरक्रिया घेणे गरजेचे आहे.

आजचा बालक व उदयाचा सुजाण नागरिक आहे ही जाणीव प्रत्येकाने ठेवायला हवी मात्र घडते याच्या उलट आपण आपल्या प्रपंचात सतत व्यस्त असतो. आपल्या मूलभुत गरजा भागल्या की आपले काम संपले असेच पालकांना आणि सर्वाणाच वाटते. नेमून दिलेल्या अभ्यासक्रम संपला की आपले काम संपेल असे शिक्षकांना वाटते. मात्र ते चूक आहे आजच्या मोबाईल युगात पालकाजवळ पैसा आहे पण मुलासाठी द्यायला वेळ नाही त्यामुळे शिक्षकांनी पालकांच्या भुमिकेत जाण्याची गरज निर्माण झाली आहे आणि ती गरज काळाची गरज बनली आहे यातच खरे दायित्व आहे.

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

पुर्वीच्या मोठ्या कुटुंबाची संकल्पना आता बदलली आहे. त्यामुळे ती अधिकच गुंतागुंतीची बनली आहे. प्रसार माध्यमाचा परिणाम सध्याच्या पिढीवर जास्त होत आहे. त्याचा परिणाम मुलांच्या अभ्यासावर व आरोग्यावर आणि विकासावर घेताना दिसून येत आहे. मुलांचे थोरामोठ्याबद्दल बोलणे बेफिकीर वागणे त्यांच्या अभ्यासातील प्रगतीमधील अडसर बनत चालत आहे. मुलांच्या अभ्यास कसा घ्यावा त्याच्याशी कस बोलावं कस वागाव त्यांना कस वाढवावा हे चिंतेचे विषय झाले आहे.

यातूनच मुलांना वाचविण्याचे आव्हान पालक आणि शिक्षकच पेलू शकतात आणि ते त्यानी स्वीकारणे ही काळाची गरज आहे. यासाठी पालकांनी आपल्या पाल्याशी मनमोकळेपणाने संवाद साधावा त्यासाठी दिवसातील काही वेळ द्यावा मुलांना समजून घ्यावे आणि महिन्यातून किमान चार ते पाचवेळा तरी शिक्षकांशी संवाद साधावा व आपल्या पाल्याची शैक्षणिक प्रगती विषयी चर्चा करावी व त्याच्या समस्या समावून घेऊन सोडवण्याचा प्रयत्न करावा त्या अर्थी ख-या अर्थाने गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रणालीमध्ये आंतरक्रियांचा उपयोग होईल व नक्की गुणवत्ता वाढण्यास मदत होईल.

**संशोधन समस्येची गरज**

१. आतंरक्रिया दोन मानवी मनामध्ये योग्य संवाद निर्माण करण्यास मदत करतात. पालक शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील शैक्षणिक हिताच नात अधिक समृद्ध होण्यासाठी सदरील विषयावर संशोधन करणे गरजेचे वाटले.
२. पालक शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रिया ह्या जर शैक्षणिकदृष्ट्या अनूकूल असतील तर त्याचा लाभ विद्यार्थ्यांना होऊ शकतो त्यामुळे औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील आंतरक्रिया नेमक्या कशा आहेत हे अभ्यासणे गरजेचे होते.
३. आज अनेक विद्यार्थी छोट्या अपयशामुळे देखील टोकाचा निर्णय घेतात त्यामुळे देखील या विषयावर संशोधन होणे गरजेचे आहे.

**संशोधनाचे महत्त्व**

१. शिक्षक पालक आणि विद्यार्थी यांच्या आंतरक्रियेचा अभ्यास केल्यास यांच्या मधील संवादातील अंतर कमी होण्यास मदत होईल.
२. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाची जडण-घडण करण्यासाठी विद्यार्थी पालक आणि शिक्षक यांच्यामधील आंतरक्रिया महत्त्वाच्या ठरतात या आंतरक्रिया विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनासोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वाच्या ठरतात.
३. शिक्षक, पालक विद्यार्थी यांच्यातील अनूकूल आंतरक्रिया असतील तर विद्यार्थ्यांची उपस्थिती व शैक्षणिक संपादणूक वाढ होण्यास मदत होईल.

**गृहीतके**

१. शाळेत विद्यार्थी संख्या जास्त असल्यामुळे शिक्षक इच्छा असूनही सर्व विद्यारर्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करू शकत नाही.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

१. औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील शैक्षणिक आंतरक्रियांचा अभ्यास करणे.

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

२. औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील शैक्षणिक आंतरक्रियांमधील येणा-या अडचणींचा शोध घेणे.

३. औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील शैक्षणिक आंतरक्रियेमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणातील येणा-या समस्यांवर उपाययोजना सूचविणे.

**संशोधन परिकल्पना**

१. औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील नियमित शैक्षणिक आंतरक्रिया होत असाव्यात.

**संशोधन पद्धत**

सदरील संशोधन हे वर्तमानकालीन पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या वर्तमान माहितीवर आधारीत असल्यामुळे संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीची निवड केली आहे.

**संशोधन साधने**

प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलनासाठी साधन म्हणून प्रश्नावली हे साधन वापरले आहे.

**कोष्टक क्र. १ शैक्षणिक आंतरक्रिया व शैक्षणिक प्रगतीबद्दल माहिती दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **पर्याय** | **प्रतिसाद** | **शे. प्रमाण** |
|---|---|---|---|
| १. | होय | ६०० | ६०० |
| २. | नाही | ४०० | ४०० |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |


**विश्लेषण :-**

वरील कोष्टक क्र. १ मधील माहितीनुसार ६०% पालकांनी होय या पर्यायास प्रतिसाद दिला तर ४०% पालकांनी नाही या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. २ पाल्याच्या मित्र मैत्रिणीबद्दल पालकांना संपूर्ण माहिती असल्या बाबतचा माहिती दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **पर्याय** | **प्रतिसाद** | **शे. प्रमाण** |
|---|---|---|---|
| १. | राहण्याचे ठिकाण | २८८ | २८.८ |
| २. | कौटुंबीक माहिती | २०८ | २०.८ |
| ३. | शैक्षणिक प्रगती | १०० | १० |
| ४. | भाषिक विकास | १०७ | १० |
| ५. | सामाजिक स्थिती | १४७ | १४.७ |
| ६. | आई-वडिलांचा भ्रमणध्वनी क्रमांक | १५० | १५ |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

**आलेख क्र. २ पाल्याच्या मित्र मैत्रिणीबद्दल तुम्हाला संपूर्ण माहिती असल्या बाबतचा माहिती दर्शविणारा आलेख**





**विश्लेषण :-**

वरील कोष्टक क्र. २ मधील माहितीनुसार २८.८% पालकांनी राहण्याचे ठिकाण या पर्यायास प्रतिसाद दिला तर २०.८% पालकांनी कौटुंबीक माहिती या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% पालकांनी शैक्षणिक प्रगती या पर्यायास प्रतिसाद दिला तर १४.७% पालकांनी सामाजिक स्थिती या पर्यायास प्रतिसाद दिला तर १५% पालकांनी आई-वडिलांचा भ्रमणध्वनी क्रमांक व व्हॉट्सअॅप या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. ३ पाल्याच्या अभ्यास व्यतिरिक्त अवांतर वाचनाबाबत माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | वर्तमानपत्र | १६७ | १६.७ |
| २. | कादंबरी | १७० | १७.० |
| ३. | नाटक / गीता, महाभारत, रामायण | ३७० | ३७.० |
| ४. | वाङ्मय | १७६ | १७.६ |
| ५. | इतर | ११७ | ११.७ |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

**आलेख क्र. ३ पाल्याच्या अभ्यास व्यतिरिक्त अवांतर वाचनाबाबत माहिती दर्शविणारा आलेख**




*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*


**विश्लेषण :-**

वरील कोष्टक क्र. ३ मधील माहितीनुसार १६.७% पालकांनी वर्तमानपत्र वाचतात या पर्यायास प्रतिसाद दिला तर १७% पालकांनी कादंबरी या पर्यायास प्रतिसाद दिला तर ३७% पालकांनी नाटक, गीता, महाभारत, रामायण या पर्यायास प्रतिसाद दिला. तर १७.६% वाङ्मय या पर्यायास प्रतिसाद दिला तर ११.७% पालकांनी इतर गोष्टी या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. ४ पाल्यावर चांगले संस्कार व्हावे असे वाटत असेल तर पालकांनी स्वतः संस्कारक्षण असावे या बाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | स्वतः संस्कारक्षम असावे | ३०० | ३० |
| २. | संस्कार केंद्र | २०० | २० |
| ३. | अध्यात्माकडे वळणे | २०० | २० |
| ४. | चांगल्या गोष्टी शिकवणे | १०० | १० |
| ५. | योगा करण्यास सांगावे | २०० | २० |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

**आलेख क्र. ४ मुलांवर चांगले संस्कार व्हावे असे वाटत असेल तर पालकांनी स्वतः संस्कारक्षण असावे या बाबत माहिती दर्शविणारा आलेख**





**विश्लेषण :-**

वरील कोष्टक क्र. ४ मधील माहितीनुसार ३०% पालकांनी स्वतः संस्कारक्षम असावे या पर्यायास प्रतिसाद दिला तर २०% पालकांनी संस्कार केंद्र या पर्यायास प्रतिसाद दिला. तर २०% स्वतः संस्कारक्षम असावेत २०% पालकांनी अध्यात्माकडे वळावे या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% पालकांनी चांगल्या गोष्टी शिकवणे या पर्यायास प्रतिसाद दिला तर २०% पालकांनी योगा करण्यास सांगावे या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. ५ पाल्याच्या अभ्यास व्यतिरिक्त अवांतर वाचनाबाबत माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | वर्तमानपत्र | १६७ | १६.७ |
| २. | कादंबरी | १७० | १७.० |
| ३. | नाटक / गीता, महाभारत, रामायण | ३७० | ३७.० |
| ४. | वाङ्मय | १७६ | १७.६ |
| ५. | इतर | ११७ | ११.७ |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

**आलेख क्र. ५ पाल्याच्या अभ्यास व्यतिरिक्त अवांतर वाचनाबाबत माहिती दर्शविणारा आलेख**




**विश्लेषण :-**


वरील कोष्टक क्र. ५ मधील माहितीनुसार १६.७% पालकांनी वर्तमानपत्र वाचतात या पर्यायास प्रतिसाद दिला तर १७% पालकांनी कादंबरी या पर्यायास प्रतिसाद दिला तर ३७% पालकांनी नाटक, गीता, महाभारत, रामायण या पर्यायास प्रतिसाद दिला. तर १७.६% वाङ्मय या पर्यायास प्रतिसाद दिला तर ११.७% पालकांनी इतर गोष्टी या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. ६ शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक त्यांच्या पाल्याची अभ्यासविषयी प्रगतीची चौकशी करण्यासाठी वर्षातून कितीवेळा भेटी देतात या बाबत शिक्षकाच्या प्रतिसादाचा तक्ता**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | आठवड्यातून एकदा | ११ | ११ |
| २. | महिन्यातून एकदा | १६ | १६ |
| ३. | पंधरा दिवसांतून एकदा | २६ | २६ |
| ४. | वर्षातून एकदा | ११ | ११ |
| ५. | नियमित | ३६ | ३६ |
| ६. | यापेक्षा वेगळे | ० | ० |
| | **एकूण** | **१००** | **१००** |

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**आलेख क्र. ६ शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक त्यांच्या पाल्याची अभ्यासविषयी प्रगतीची चौकशी करण्यासाठी वर्षातून कितीवेळा भेटी देतात या बाबत माहिती दर्शविणारा आलेख**





**विश्लेषण :-**

वरील कोष्टक क्र. ६ मधील माहितीवरून ११% शिक्षकांना आठवड्यातून एकदा भेटायला येतात. या पर्यायास प्रतिसाद दिला तर १६% शिक्षकांना महिन्यातून एकदा भेटायला येतात. या पर्यायास प्रतिसाद दिला तर २६% शिक्षकांनी पंधरा दिवसांतून एकदा भेटायला येतात. या पर्यायास प्रतिसाद दिला तर ११% शिक्षकांना वर्षातून एकदा भेटायला येतात. या पर्यायास प्रतिसाद दिला तर ३६ % शिक्षकांनी नियमित भेटायला येतात. या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. ७ शाळेतील विविध कार्यक्रमांची आखणी सुस्पष्ट होण्यासाठी शिक्षक कोणत्या बाबीं विचारात घेतात या बाबतची माहिती दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | शाळेत मिटींग घेऊन | २५ | २५ |
| २. | सहकार्याबरोबर चर्चा | ३५ | ३५ |
| ३. | शाळेसाठी सदर कार्यक्रमाच्या उपयुक्ततेचे समर्थन | १० | १० |
| ४. | अडचणी मर्यादा, व्याप्ती निश्चिती | १३ | १३ |
| ५. | शालेय लोकसंख्येचा सहभाग | १७ | १७ |
| ६. | कार्यपद्धती व नियोजन | ० | ० |
| | **एकूण** | **१००** | **१००** |

**आलेख क्र. ७ शाळेतील विविध कार्यक्रमांची आखणी सुस्पष्ट होण्यासाठी शिक्षक कोणत्या बाबीं विचारात घेतात या बाबतची माहिती दर्शविणारा आलेख**




**विश्लेषण :-**


वरील कोष्टक क्र. ७ मधील माहितीनुसार २५% शिक्षकांनी शाळेत मिटींग घेऊन विचार करतात. या पर्यायास प्रतिसाद दिला तर ३५% शिक्षकांनी सहकार्याबरोबर चर्चा करतात या पर्यायाशी प्रतिसाद दिला. तर १०% शिक्षकांनी शाळेतील सदर उपयुक्त भौतिक संसाधन या पर्यायास प्रतिसाद दिला. तर १३% शिक्षकांनी अडचणी मर्यादा व्याप्ती निश्चिती करतात या पर्यायास प्रतिसाद दिला. तर १७% शिक्षकांनी शालेय लोकसंख्येचा सहभाग या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. ८ शाळेमध्ये पालक सभा घेण्यामागचा मुख्य उद्देशाबाबत माहिती दर्शविणारा तक्ता.**

| **अ.क्र.** | **पर्याय** | **प्रतिसाद** | **शे. प्रमाण** |
|---|---|---|---|
| १. | पालक समिती स्थापन करण्यासाठी | २० | २० |
| २. | शाळेला आर्थिक मदत मिळण्यासाठी | २० | २० |
| ३. | शाळेत पालकांचा सहभाग वाढण्यासाठी | १० | १० |
| ४. | विद्यार्थ्यांचा विकास होण्यास मदत | ४० | ४० |
| ५. | पालक व शिक्षकांमध्ये सुसंवाद वाढण्यासाठी | १० | १० |
| | **एकूण** | **१००** | **१००** |

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**आलेख क्र. ८ शाळेमध्ये पालक सभा घेण्यामागचा मुख्य उद्देशाबाबत माहिती दर्शविणारा आलेख**




**विश्लेषण :-**


वरील कोष्टक क्र. ८ मधील माहितीनुसार २०% शिक्षकांनी पालक समिती स्थापन करण्यासाठी या पर्यायास प्रतिसाद दिला. तर २०% शिक्षकांनी शाळेला आर्थिक मदत मिळण्यासाठी या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% शिक्षकांनी शाळेत पालकांचा सहभाग वाढविण्यासाठी या पर्यायास प्रतिसाद दिला. तर ४०% शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा विकास होण्यास मदत या पर्यायास प्रतिसाद दिला. तर १०% शिक्षकांनी पालक व शिक्षकामध्ये सुसंवाद वाढविण्यासाठी या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. ९ पालक पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीविषयी समाधानी असल्यास वर्षातून किती वेळा शिक्षकांशी चर्चा करतात याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | आठवड्यातून एकदा | ३०० | ३० |
| २. | पंधरा दिवसातून एकदा | २०० | २० |
| ३. | महिन्यातून एकदा | २०० | २० |
| ४. | ३ महिन्यांतून एकदा | १०० | १० |
| ५. | ६ महिन्यांतून एकदा | १०० | १० |
| ६. | वर्षातून एकदा | १०० | १० |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**आलेख क्र. ९ पालक पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीविषयी समाधानी असल्यास वर्षातून किती वेळा शिक्षकांशी चर्चा करतात याबाबत माहिती दर्शविणारा आलेख**




**विश्लेषण :-**


कोष्टक क्रमांक ९ मधील माहितीनुसार ३०% विद्यार्थ्यांचे पालक आठवड्यातून एकदा भेटतात या पर्यायास प्रतिसाद दिला. तर २०% विद्यार्थ्यांचे पालक पंधरा दिवसातून एकदा भेटतात. या पर्यायास प्रतिसाद दिला तर २०% विद्यार्थ्यांचे पालक महिन्यातून एकदा भेटतात या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% विद्यार्थ्यांचे पालक ३ महिन्यातून एकदा भेटतात या पर्यायास प्रतिसाद दिला. तर १०% विद्यार्थ्यांचे पालक ६ महिन्यातून एकदा भेटतात या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% विद्यार्थ्यांचे पालक वर्षातून एकदा भेटतात या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. १० विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याबाबत दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | शुद्ध लेखन | २०० | २० |
| २. | स्पष्ट वाचन | १०० | १० |
| ३. | भाषण | १०० | १० |
| ४. | वाद-विवाद स्पर्धा | २०० | २० |
| ५. | पाठांतर स्पर्धा | ३०० | ३० |
| ६. | टाकाऊ वस्तूपासून टिकावू वस्तू बनवणे | १०० | १० |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**आलेख क्र. १० विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याबाबत माहिती दर्शविणारा आलेख**





**विश्लेषण :-**

कोष्टक क्रमांक १० मधील माहितीनुसार २०% विद्यार्थी शुद्ध लेखन या पर्यायास प्रतिसाद दिला. तर १०% विद्यार्थी स्पष्ट वाचन या पर्यायास प्रतिसाद दिला तर २०% विद्यार्थी वाद-विवाद स्पर्धा या पर्यायास प्रतिसाद दिला तर ३०% विद्यार्थी पाठांतर स्पर्धा या पर्यायास प्रतिसाद देतात तर १०% विद्यार्थी टाकाऊ वस्तूंपासून टिकावू वस्तू बनवणे या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. ११ मुलांच्या अभ्यासाचे नियोजन कशा पद्धतीने करतात या बाबत माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | वेळापत्रक करून | ३३० | ३३ |
| २. | शाळेच्या वेळापत्रकानुसार | २३२ | २३.२ |
| ३. | कधी-कधी | १८३ | १८.३ |
| ४. | परीक्षा जवळ आल्यावर | २५५ | २५.५ |
| ५. | यापेक्षा वेगळे | ०० | ०० |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

**आलेख क्र. ११ मुलांच्या अभ्यासाचे नियोजन कशा पद्धतीने करतात या बाबत माहिती दर्शविणारा आलेख**




Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies


**विश्लेषण :-**

कोष्टक क्रमांक ११ मधील माहितीनुसार ३३% विद्यार्थी वेळापत्रक करून या पर्यायास प्रतिसाद दिला तर २३.२% विद्यार्थ्यांना दररोज या पर्यायास प्रतिसाद दिला तर १८.३% विद्यार्थ्यांना कधी-कधी या पर्यायास प्रतिसाद दिला तर २५.५% विद्यार्थ्यांची परीक्षा जवळ आल्यावर या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. १२ पालक-शिक्षक चर्चा करताना विद्यार्थ्यांच्या मत व सहभागाबाबत माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | वाचणाची गतीविषयी | १०० | १० |
| २. | लिखाणाची गतीविषयी | १०० | १० |
| ३. | मनमोकळेपणाने बोलण्याविषयी | १०० | १० |
| ४. | गैरहजेरी विषयी | ३०० | ३० |
| ५. | आरोग्यविषयी | २०० | २० |
| ६. | नीटनेटकेपणाविषयी | १०० | १० |
| ७. | आत्मविश्वास विषयी | १०० | १० |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

**आलेख क्र. १२ पालक शिक्षक चर्चा करताना तुम्हाला सहभाग करून विद्यार्थ्यांचे मत दोघेही जाणून घेतात या बाबत माहिती दर्शविणारा आलेख**




**विश्लेषण :-**


कोष्टक क्रमांक १२ मधील माहितीनुसार १०% विद्यार्थ्यांनी वाचण्याच्या गतिविषयी या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% विद्यार्थ्यांनी लिखाणाची गतिविषयी या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% विद्यार्थ्यांनी मनमोकळेपणाने बोलण्याविषयी या पर्यायास प्रतिसाद दिला तर ३०% विद्यार्थ्यांना गैरहजेरीविषयी या पर्यायास प्रतिसाद दिला तर २०% विद्यार्थी आरोग्यविषयी या पर्यायास प्रतिसाद दिला तर १% विद्यार्थी नीटनेटकेपणाविषयी या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% विद्यार्थी आत्मविश्वासाविषयी या पर्यायास प्रतिसाद दिला.

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**कोष्टक क्र. १३ पालक-पाल्यासोबत शाळेव्यतिरिक्त विविध ठिकाणी शैक्षणिक भेटी देतात या बाबत माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ग्रंथालय | २०० | २० |
| २. | संग्रहालय | ३०० | ३० |
| ३. | प्राणी संग्रहालय | २०० | २० |
| ४. | किल्ले | २५० | २५ |
| ५. | प्रसिद्ध ठिकाणी | ५० | ५ |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

**आलेख क्र. १३ पाल्याला शाळेव्यतिरिक्त परिसरातील विविध ठिकाणी शैक्षणिक भेटी देतात या बाबत माहिती दर्शविणारा आलेख**




**विश्लेषण :-**

कोष्टक क्रमांक १३ मधील माहितीनुसार २०% पालक-पाल्याला शाळेव्यतिरिक्त परिसरातील ग्रंथालयाला भेटी देतात. तर ३०% पालक पाल्याला शाळेच्या व्यतिरिक्त परिसरातील ऐतिहासिक संग्रहालय भेटी देतात. तर २०% पालक-पाल्याला शाळेव्यतिरिक्त परिसरातील प्राणी संग्रहालय भेटी देतात. २५% पाल्याला शाळेव्यतिरिक्त परिसरातील किल्ल्यांना भेटी देतात तर ५% पाल्यांना शाळेव्यतिरिक्त परिसरातील प्रसिद्ध ठिकाणी भेटी देतात.

**निष्कर्ष :**

१. ६०% पाल्याच्या शैक्षणिक आंतरक्रिया व शैक्षणिक प्रगतीबद्दल समाधानी आहेत.

२. २८.८% पालकांना पाल्याच्या मित्र-मैत्रिणीबद्दल राहण्याचे ठिकाण व याबद्दल माहित आहे.

३. ३७ % पाल्य अभ्यासाव्यवतिरिक्त अवांतर नाटक गीता, महाभारत, रामायण इ. पुस्तकांचे वाचन करतात.

४. सर्वाधिक ३०% पालकांच्या मते अगोदर स्वत: संस्कारक्षम असावे.

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

५. ३७ % पाल्य अभ्यासाव्यवतिरिक्त अवांतर नाटक गीता, महाभारत, रामायण इ. पुस्तकांचे वाचन करतात.

६. नियमित पाल्याच्या अभ्यासाविषयी चौकशी करणा-या पालकांची संख्या ३६% आहे.

७. शाळेत मिटिंग घेऊन, सहकार्याबरोबर चर्चा, शाळेसाठी सदर कार्यक्रमाच्या उपयुक्ततेचे समर्थन, अडचणी, मर्यादा, व्याप्ती निश्चिती, शालेय लोकसंख्येचा सहभाग, कार्यपद्धती व नियोजन इत्यादी बाबी शिक्षक विचारात घेऊन कार्यक्रमाची आखणी करतात.

८. ४०% शाळेमध्ये पालक सभा घेण्यामागचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठी होतो.

९. सर्वाधिक ३०% विद्यार्थ्यांचे पालक आठवड्यातून एकदा भेटतात.

१०. शुद्ध लेखन, स्पष्ट वाचन, भाषण, वाद-विवाद स्पर्धा, पाठांतर स्पर्धा, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनविणे, वरील सर्व विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक वाढविण्यासाठी स्पर्धा घेतात.

११. ३३%विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे नियोजन वेळापत्रकानुसार करतात.

१२. वाचनाची गतीविषयी, लिखानाची गतीविषयी मनमोकळेपणाने बोलण्याविषयी, गैरहजेरीविषयी, आरोग्यविषयी, नीटनेटकेपणा विषयी, आत्मविश्वासविषयी पालक शिक्षक चर्चा करताना विद्यार्थ्यांच्या सहभाग घेतात.

१३. ग्रंथालय, संग्रहालय, प्राणी संग्रहालय (उद्यान) किल्ले, प्रसिद्ध ठिकाण, पालक पाल्यासोबत शैक्षणिक भेटी देतात.

**संदर्भ ग्रंथसूची**

*घोरमोडे के. यु. आणि घोरमोडे कला (२००६) : शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, प्रथम आवृत्ती, नागपूर : विद्या प्रकाशन.*

*पंडित प. ब. (२००८) : शिक्षणातील संशोधन, पुणे : नूतन प्रकाशन.*

*भांडारकर के. एम. (२०१०) : सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, तिसरी आवृत्ती, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.*

*सोनाली दातार (२०१३), ''संगोपन पालकत्वाचे (, प्रथमावृत्ती, पुणे, उन्मेष प्रकाशन.*

*श्रुती पानसे (२००७), ''अशी का वागतात मुल'', पहिली आवृत्ती, पुणे, उन्मेष प्रकाशन.*

*रोहिणी चितळे (१९९२), ''मुलाशी सुसंवाद'', प्रथमावृत्ती, पुणे, उन्मेष प्रकाशन.*

*डॉ. अनुराधा सोवनी आणि माधुरी भिडे (२००७), ''आपली मुले का बिघडतात'', प्रथमावृत्ती, पुणे : उन्मेष प्रकाशन.*

*भिंतोडे वि. रा. (२००७), ''शैक्षणिक संशोधन पद्धती, नुतन प्रकाशन, पुणे.*

*मुळे रां. शं. व उमाठे वि. तु. (१९९८), ''शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे आवृत्ती ३ नुतन प्रकाशन, पुणे.*

*www.shodhganga.com*

*www.maha.gov.in*

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*